**साध्या, निमआराम, वातानुकूलित (शिवनेरी) सेवेच्या बसेसचे नैमित्तिक कराराचे दर व इतर आकाराबाबत.**

नैमित्तीक कराराचे सुधारीत दर, अटी व शर्ती (कार्यपद्दती) खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहेत:-

नैमित्तिक कराराचे दर नेहमीच्या कार्यपध्दतीप्रमाणे खालील दोन हंगामात वेगवेगळे ठरविण्यात आले आहेत.

१. **गर्दीचा हंगाम व कमी गर्दीचा हंगाम** :-

हंगामाचा कालावधी खालीलप्रमाणे राहील.

**अ ) गर्दीचा हंगाम** - १ मार्च ते ३० जून
**ब ) कमी गर्दीचा हंगाम** - १ जुलै ते २८ / २९ फेब्रुवारी

**सेवा प्रकारानुसार नैमित्तिक करारावर देण्यात येणा-या गाडयांचे एकेरी व दुहेरी फेरीकरिता आकारावयाचे प्रति कि. मी. सुधारीत दर पुढील प्रमाणे असून ते दिनांक ११/०५/२०१० पासून (दिनांक १०/०५/२०१० व ११/०५/२०१० च्या मधील मध्यरात्र) अंमलात आणावेत.**

२. **सेवा प्रकारानुसार प्रति कि.मी. दर**

(अ) प्रति कि.मी.दर रुपयाच्या पटीत परंतु १ ते ४९ पैसे मागील तर ५० ते ९९पैसे पुढील रूपयाच्या पटीत पूर्णाकित केलेले आहेत.
(ब) एकेरी फेरीचे दर दुहेरी फेरीच्या दरापेक्षा ७५% ने जास्त ठेवण्यात आले आहेत.
(क) साध्या सेवेत साधी २×३ व परिवर्तन २×३ बसेसचा समावेश करण्यात आला आहे.
(ड) परिवर्तन २X२ व मिडी बसेसचे कि.मी.दर स्वतंत्र दिलेले आहेत.
(ई) वातानुकूलीत शिवनेरी व साध्या सेवेतील मिडीबसचे कि.मी.दर दोन्ही हंगामात सारखेच ठेवण्यात आलेले आहेत.
(ग) अशा प्रकारे सेवानिहाय नियोजित प्रति कि.मी.दर खालीलप्रमाणे आहेत.

| सेवेचा प्रकार व आसनक्षमता | गर्दीचा हंगाम - ( १ मार्च ते ३० जून ) प्रति कि.मी. दर | | कमी गर्दीचा हंगाम - (१ जुलै ते २८ / २९ फेब्रुवारी ) प्रति कि.मी. दर | |
|---|---|---|---|---|
| | दुहेरी | एकेरी | दुहेरी | एकेरी |
| **अ) साधी सेवा**<br>५० आसनापर्यंत | ३३.०० | ५८.०० | ३१.०० | ५४.०० |
| ५५ आसनापर्यंत | ३६.०० | ६४.०० | ३४.०० | ६०.०० |
| ६६ आसनांपर्यंत | ४४.०० | ७६.०० | ४१.०० | ७१.०० |
| **ब)परिवर्तन बस ( २×२)**<br>४५ आसनापर्यंत | ३५.०० | ६२.०० | ३२.०० | ५५.०० |
| ५० आसनापर्यंत | ३९.०० | ६९.०० | ३५.०० | ६१.०० |
| **क) निमआराम सेवा**<br>४० आसनांपर्यंत | ३५.०० | ६०.०० | ३१.०० | ५४.०० |
| **ड) वातानुकूलित शिवनेरी**<br>४५ आसनांपर्यत | ६२ .०० | १०९.०० | दोन्ही हंगामात सारखे | दोन्ही हंगामात सारखे |
| **ई) ३२ आसनी मिडीबस (साधी सेवा )** | २९.०० | ५१.०० | दोन्ही हंगामात सारखे | दोन्ही हंगामात सारखे |

**३. नैमित्तिक कराराच्या कालावधीत सरासरी दैनिक ३००आकारणीय कि.मी. (Chargeable Kms.) पेक्षा जास्त अंतराचा नैमित्तिक करार केल्यास मागणीकार प्रवाशास देय सवलती -**

(१) एकूण आकारणीय कि.मी. ( Chargeable Kms.) च्या आकारात २ टक्के सूट. परंतु दैनिक ३०० पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.होणे बंधनकारक.

(२) आगार ते प्रवासी घेण्याचे ठिकाण यातील जावून येवून होणारे प्रत्यक्ष अंतर व २० कि.मी. यापैकी जे अंतर कमी असेल त्या अंतराची एकूण कि.मी.मधून वजावट व उर्वरीत कि.मी. वर आकारणी,(परिपत्रक क्र.४७/२००६ प्रमाणे) परंतु दैनिक ३०० पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.महामंडळास मिळणे बंधनकारक.

**टिप : एकूण कि.मी. - सूट दयावयाचे कि.मी. = आकारणीय कि.मी.**

पक्षकारास नैमित्तीक कराराच्या अंतिम बीलात सवलत देताना रा.प.महामंडळास दैनिक आकारणीय ३०० पेक्षा जास्त कि.मी. मिळणे आवश्यक असून सुट देताना जर ३०१ ते ३१९ चा दैनिक आकारणीय कि.मी.चा करार झाला असल्यास त्यास ३०० कि.मी वजा जाता १ ते १९ कि.मी.पर्यंतचा जाऊन येऊन प्रत्यक्ष होणारे २० कि.मी.पर्यंतचे अंतर यातील जे अंतर कमी असेल त्याची बिलात सूट देता येईल.

(३) सा. स्थायी आदेश क्र.१२०१ नुसार नैमित्तिक करारावर घेतलेल्या बसच्या दिवसाची गणना ००.०० ते २४.०० अशी केली जाते. नैमित्तीक कराराची बस रात्री परत येण्याबाबत दिल्या जाणा-या सवलतीबाबत वाहतूक खाते परिपत्रक क्र. २६/२००० - राप / वाह / चालन / सा. ८८/ ८०४८ दिनांक २९.११.२००० नुसार नैमित्तिक करारावर पक्षकाराने घेतलेली बस रात्रीच २.०० वाजेपर्यंत केव्हाही परत केली तर त्या प्रसंगी ००.०० ते २.०० वाजेपर्यंतच्या कालावधीची गणना पुढील दिवसात करण्यात येऊ नये अशी सूचना दिलेली असून सध्याच्या उपरोक्त सुचनेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही, परंतु त्यासाठी सदर दिवशी दैनिक (सरासरी)३०० पेक्षा जास्त आकारणीय कि.मी. बंधनकारक आहेत.

(४) दैनंदिन (सरासरी) ३०० कि.मी.पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.झाल्यास होणा-या खोळंबा आकारात दैनंदिन (सरासरी) १ तासाची सवलत देण्यात येऊन उर्वरीत तासांसाठी खोळंबा आकार आकारण्यात यावा. ३०० कि.मी.पेक्षा कमी कि.मी.झाल्यास खोळंबा आकारामध्ये सवलत देण्यात येणार नाही. (यापुर्वी ३०० पेक्षा जास्त आकारणीय कि.मी. झाल्यास खोळंबा आकार माफ करण्यात येत होता त्यात बदल करण्यात आलेला आहे.)

(५) चालकाचा अतिकालिक भत्ता आकारणी करतानां दैनंदिन ३०० कि.मी.पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.झाल्यास चालकाचा अतिकालीक भत्ता माफ करण्यात येतो परंतु यात बदल करण्यात आला असून दैनंदिन ३०० पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.झाल्यास त्या नैमित्तीक करारात दैनंदिन (सरासरी) १ तासाची अतिकालीक भत्त्यासाठी सुट देण्यात येऊन उर्वरीत सर्व अतिकालीक भत्ता पक्षकाराकडून वसूल करण्यात यावा. दैनंदिन ३००कि.मी.पेक्षा कमी कि.मी.झाल्यास चालकाचा संपुर्ण अतिकालीक भत्ता पुर्वीप्रमाणेच पक्षकाराकडून वसूल करण्यात येईल. (यापुर्वी ३००पेक्षा जास्त आकारणीय कि.मी. झाल्यास चालकाचा अतिकालीक भत्ता पक्षकाराकडून वसूल न करता माफ करण्यात येत होता त्यात बदल करण्यात आला आहे.)

**४.** मिडी व वातानुकूलित बसेसच्या बाबतीत कि.मी.चे दर दोन्ही हंगामात सारखेच राहतील.

**५.** रा.प. महामंडळाचे ट्रक / टँकर्स उपलब्ध असल्यास ते नैमित्तिक करारावर देतांना या कार्यालयाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. उपरोक्त ट्रक / ट्रँकर्ससाठी बिलाची आकारणी ५५ आसन क्षमतेच्या गाडीच्या गर्दीच्या हंगामातील प्रती कि.मी.च्या दराने परंतु किमान आकारासह व इतर आकारणी साध्या गाडीच्या आकारणीप्रमाणे करण्यात येईल.

६. सर्वच राजकीय पक्षाना, पक्षानी आयोजीत केलेल्या कार्यक्रमांकरीता रा.प.महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेस नैमित्तीक करारावर उपलब्ध करून देण्यात येतील. त्याकरीता नियमानुसार अनामत रक्कम स्विकारून नैमित्तीक करार करून घेण्यात येतील.

७. **कायम स्वरुपी नैमित्तिक करारावर देण्यात येणाऱ्या गाडयांबाबत**

कारखाने, कार्यालये व खाजगी कंपन्यांकडून मासिक अथवा आठवडा कालावधीसाठी सुट्टीचे दिवस सोडून अथवा धरुन नैमित्तिक करारावर साध्या गाडयांची मागणी आल्यास आकारावयाच्या प्रति कि.मी.चा दर हा गर्दीच्या हंगामातील प्रति कि.मी.दरानुसार संपूर्ण वर्षासाठी लावण्यात येईल अशा सुचना यापुर्वी देण्यात आलेल्या होत्या. परंतु काही वेळा बंद, संप किंवा वाहतुकीतील अडथळे यामुळे नैमित्तीक करार पुर्ण न करू शकल्यास होणा-या नुकसानीबाबत रा.प.महामंडळास जबाबदार धरण्यात येते म्हणून अपरिहार्य कारणांमुळे (संप, मोर्चे, बंद,नैसर्गिक आपत्ती इ.) बस उपलब्ध करून देणे शक्य न झाल्यास त्याची जबाबदारी रा.प.महामंडळाची राहाणार नाही. सदर अट लेखी स्वरूपात पक्षकाराने मान्य केल्यास कारखाने, कार्यालये व खाजगी कंपन्यांना गर्दीच्या हंगामातील प्रति कि.मी.दरानुसार कायम स्वरूपी नैमित्तीक करारावर रा.प.बसेस उपलब्ध करून देण्यात येतील.

८. **विद्यार्थी सवलतीचे दर**

(अ) शाळा - कॉलेजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीच्या नैमित्तिक कराराच्या भाडयात ५० टक्के प्रमाणे सवलत देण्याचा महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र.एसटीसी-३४०१ / सीआर-४२ / भाग १ /परि -१ दिनांक ५ डिसेंबर, २००५ अन्वये घेतल्यानुसार ५० टक्के सवलत देऊन ५० टक्के दराने आकारणी केली जाते.

विद्यार्थी सवलतीचे नियोजित दर खालीलप्रमाणे आहेत.

| साध्या गाडीची आसन क्षमता | सर्वसाधारण प्रवाशांना नैमित्तीक कराराचा लावलेला दर | विद्यार्थी सवलतीचे ५० टक्के दराने शासनाकडून प्रतिपुर्तिसाठी मागावयाचे दर | ५० टक्के सवलत वजा जाता विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष घ्यावयाचे दर |
|---|---|---|---|
| ४१ ते ५० आसने | ३३.०० | १६.५० | १६.५० |
| ५१ ते ५५ आसने | ३६.०० | १८.०० | १८.०० |
| ५६ ते ६६ आसने | ४४.०० | २२.०० | २२.०० |
| परिवर्तन बस (२×२) | | | |
| ४५ आसनापर्यंत | ३५.०० | १७.५० | १७.५० |
| ४६ ते ५० आसने | ३९.०० | १९.५० | १९.५० |

(ब) मात्र इतर दरात, जसे खोळंबा आकार, रद्द आकार, किमान आकार, अधिक प्रवासी बोजा आकार, इत्यादीमध्ये सवलत दिली जात नाही. तसेच २५% उभे प्रवासी नेण्याची सवलतसुध्दा दिली जाणार नाही. विद्यार्थी सवलत केवळ साध्या व परिवर्तन गाडीच्या नैमित्तीक कराराच्या कि.मी.च्या दरावरच दिली जाईल. (हा जुना नियम पुढे तसाच चालू ठेवण्यात येईल)

(क) वरील सवलतीचे दर फक्त महाराष्ट्रापुरतेच मर्यादित असून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी लागू राहतील. इतर राज्यात व इतर राज्यातील विद्यार्थ्यांना सवलतीच्या दराने नैमित्तिक करारावर बस दिली जाणार नाही. ( हा जुना नियम पुढे तसाच चालू ठेवण्यात येईल )

(ड) मिडी, निमआराम, वातानुकूलीत बसेस विद्यार्थ्यांना सवलतीच्या दराने दिल्या जाणार नाहीत. (हा जुना नियम पुढे तसाच चालू ठेवण्यात येईल)

(ई) शैक्षणिक सहलीसाठी शाळांना देण्यात येणा-या बसेसबाबत पत्र क्र. राप / वाह / चालन/ सा.८८/ नै.क. / ६६४३ दिनांक ६ डिसेंबर, २००५ मधील सुचनांनुसार बसेसची संख्या व कि.मी.बाबतची मर्यादा रद्द करण्यात आली असून त्यांच्या मागणीनुसार बसेस पुरविण्यात याव्यात.

| सर्वसाधारण प्रवाशांना गर्दीच्या हंगामातील प्रति कि.मी. दर | __ (वजा) | विद्यार्थ्यांना लावलेला प्रति कि.मी. सवलतीचा दर | = | शासनाकडून मागावयाच्या प्रतिपूर्तीचा प्रति. कि.मी. दर |
|---|---|---|---|---|

(दिनांक १४.५.२००३ पासून कार्यान्वित असलेले हे सूत्र पुढे तसेच चालू ठेवण्यात येईल )

## ९. किमान आकार (प्रतिदिन प्रतिबस)

दिनांक १३.०३.२०१० पासून जुन्या भाडेदरांत ७.६९ टक्के प्रमाणे झालेली वाढ व सर्वसाधारण खर्चामध्ये झालेली वाढ विचारात घेऊन नैमित्तीक करारावर देण्यात येणा-या बसेसचे किमान दर खाली नमूद केल्यानुसार राहातील. (किमान आकार म्हणून फक्त कि.मी.चा आकार धरण्यात यावा.)

| बसेसचा प्रकार | सध्याचा प्रति बस किमान आकार (रु ) | दिनांक ११.०५.२०१० पासून लागू करावयाचा नवीन किमान आकार (रु.) |
|---|---|---|
| १. सर्व प्रकारच्या साध्या बस गाडया | ५,०००/- | ५,४००/- |
| २. सर्व प्रकारच्या परिवर्तन २×२ बसेस | ५,०००/- | ५,५००/- |
| ३. सर्व प्रकारच्या निमआराम बसेस | ७,०००/- | ७,५००/- |
| ५. सर्व प्रकारच्या वातानुकूलित बसेस | ३०,०००/- | ३२,०००/- |

**शालेय विद्यार्थ्यांना सवलतीने देण्यात येणा-या बसेसच्या बिलावरील किमान आकारावरील कार्यवाही करताना पत्र क्र. राप/वाह/चालन/सा.८८/नै.क./९८१८ दिनांक ११ डिसेंबर, २००८ अन्वये किमान आकार रू. ३०००/- प्रमाणे व त्यात दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.**

## १०. खोळंबा आकार (प्रति बस)

नैमित्तीक करारावर देण्यात येणा-या बसेसचा खोळंबा आकार खाली नमूद केल्यानुसार राहील.

| गाडीचा प्रकार | सध्याचा ताशी खोळंबा आकार (प्रति तास ) | | दिनांक ११.०५.२०१० पासून लागू करावयाचा नवीन प्रति तास खोळंबा आकार | |
|---|---|---|---|---|
| | कमी गर्दीचा हंगाम | जास्त गर्दीचा हंगाम | कमी गर्दीचा हंगाम | जास्त गर्दीचा हंगाम |
| सर्व साध्या बसेस | ६५ | १०० | ७५ | ११० |
| सर्व परिवर्तन बसेस (२×२ आसन क्षमता) | १३० | १३० | १४५ | १४५ |
| सर्व निमआराम बसेस | १३० | १३० | १४५ | १४५ |
| सर्व वातानुकूलिम बसेस | ३१० | ३१० | ३१० | ३१० |

(अ) नैमित्तिक करारावर घेतलेल्या बसच्या दिवसाची गणना ००.०० ते २४.०० अशी केली जाते. पक्षकाराने नैमित्तिक करारावर घेतली असून त्यांनी दुस-या दिवशी ०२.०० वाजेपर्यंत (रात्रीचे) केव्हाही परत केली तर त्या प्रसंगी २४.०० ते ०२.०० वाजेपर्यंतच्या कालावधीची गणना पुढील दिवसासाठी करण्यांत येणार नाही, मात्र त्यासाठी प्रति बस सरासरी ३०० किमी पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.झालेच पाहिजेत.( ही पुर्वीची सवलत पुढेही चालू राहील)

(ब) एकेरी फेरीच्या कराराबाबत सामान्यत: खोळंबा आकार देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अपवादात्मक बाबतीत खोळंबा झाल्यास दुहेरी फेरीसाठी नमूद केलेल्या दराने खोळंबा आकार घेण्यात यावा. वर नमूद केलेले दर हे दुहेरी फेरीसाठी आहेत.

(क) यल्लंम्मा ( सौंदत्ती ) यात्रेसाठी नैमित्तिक करारावर देण्यात येणा-या फक्त साध्या गाडयांचा खोळंबा आकार कमी गर्दीच्या हंगामात येत असल्यामुळे कमी गर्दीच्या हंगामातील दरानुसार ठेवण्यात

येतील, परंतु या मार्गावर गर्दीच्या हंगामात यात्रा आल्यास ती गर्दीच्या हंगामातील दरानुसार खोळंबा आकार आकारण्यात येईल.

(ड) नैमित्तिक कराराच्या एकूण कालावधीत सर्व सेवेच्या बसेससाठी प्रतिबस दैनिक (सरासरी) कि.मी. धाव ३०० आकारणीय कि.मी.पेक्षा जास्त झाल्यास खोळंबा आकार व चालकाचा अतिकालिक भत्ता आकारणीच्या पध्दतीत बदल प्रस्तावीत करण्यात आला असून सरासरी ३०० पेक्षा जास्त दैनिक कि.मी.झाल्यास दैनिक १ तासाची सुट देऊन उर्वरीत तासांसाठी खोळंबा आकार व चालकाचा अतिकालीक भत्ता पक्षकाराकडून घेतला जाईल. दैनिक (सरासरी) ३०० कि.मी.पेक्षा कमी कि.मी.च्या नैमित्तीक करारांकरीता संपुर्ण खोळंबा आकार व चालकाचा अतिकालीक भत्ता पक्षकाराकडून वसुल करण्यात येईल.

(ई) विद्यार्थ्यांसाठी कि.मी.च्या दरात शासन निर्णयानुसार सवलत देत असल्याने सदरची सवलत फक्त कि.मी.दरात देऊन नैमित्तिक कराराच्या गाडयांबाबत कि.मी.ची धाव विचारात न घेता प्रचलित पध्दतीनुसार उपरोक्त दराने खोळंबा आकार व चालकाचा अतिकालिक भत्ता वसूल करण्यात यावा.

## १२. करार रद्द करणे (प्रतिबस)

(अ) पक्षकाराने नैमित्तिक करारावर घेतलेली गाडी काही कारणास्तव रद्द केली तर रद्द करण्याचा आकार म्हणून काही रक्कम त्याने भरलेल्या अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येवून उर्वरीत रक्कमेचा परतावा पक्षकारास देण्यात येतो, ही पूर्वापार पध्दत तशीच चालू ठेवण्यात येईल. करार रद्द करण्याचे सद्याचे दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

| गाडीचा प्रकार | करार रद्द करण्याचा आकार, प्रति बस (रु) |
|---|---|
| साध्या गाडया | ३,०००/- |
| परिवर्तन २×२ /२×३ आसन क्षमता | ३,०००/- |
| निमआराम गाडया | ४,०००/- |
| वातानुकूलित गाडया | १०,०००/- |

(ब) पक्षकाराने अनामत रक्कमेचा भरणा करुन कराराची नोंद केलेल्या दिवसापासून (तारखेपासून ) करार पार पाडावयाच्या नियोजित दिवसाच्या नियोजित वेळेपर्यंत करार रद्द केल्यास उपरोक्त दराने करार रद्द करण्याचा आकार वसूल करण्यात येईल. परंतु वरील मुदतीत करार रद्द करण्याबाबत पक्षकाराने काहीच कळविले नाही, आणि पक्षकाराच्या जागेवर नैमित्तिक कराराची बस, पक्षकाराने करार रद्द केल्याने जाऊन परत आल्यास त्याच्या अनामत रक्कमेतून उपरोक्त दराने येणारा रद्द करण्याचा आकार अधिक गाडी जाऊन परत येण्यासाठी झालेल्या कि.मी.चा आकार मिळून येणारी रक्कम पक्षकाराच्या अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल. रद्द न करण्यात आलेल्या नैमित्तिक करारावरील बसेसची नैमित्तिक कराराची तारीख बदलण्याबाबत पत्र क्र. राप / वाह / चालन / सा.८८/ नै.क / ९८१८ दि.११.१२.२००८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

*सा. स्था. आदेश कर. १२०१ मधील तरतुदीनुसार एखादया नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा पक्षकाराच्या कुटुंबातील व्यक्तीच्या निधनामुळे (रक्ताचे नाते असलेली व्यक्ती उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, मुलगा , मुलगी इ.) पक्षकारास नैमित्तीक करार रद्द करावयाचा झाल्यास किंवा तारीख बदलून पुढील तारीख घ्यावयाची असल्यास, घटनेच्या तारखेपासून पुढील १ महिन्यापर्यंत कोणताही आकार न आकारता पक्षकारास पुढील तारीख बदलून देण्याची अथवा करार रद्द करण्याची मुभा देण्यात येईल. पत्र क्र. राप/ वाह/ चालन/ सा.८८/ नै.क./ ९८१८ दिनांक ११ डिसेंबर, २००८ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार इतर कारणांसाठी कार्यवाही करण्यात येईल.

## १२. चालकाचा अतिकालीक भत्ता

नैमित्तिक कराराच्या गाडीवर कामगिरी दिलेल्या चालकास त्या कामगिरीवर होणारा अतिकालीक कामाचा मोबदला महामंडळाच्या दरानुसार दिला जातो तो पक्षकाराकडून वसूल करण्याच्या सध्याच्या पध्दतीत बदल करण्यात येत असून सर्व प्रकारच्या गाडयांसाठी नैमित्तिक कराराच्या एकूण कालावधीत दिलेल्या गाडयांचे प्रतिबस दैनिक सरासरी आकारणीय कि.मी.३०० पेक्षा जास्त झाल्यास पक्षकाराकडून खोळंबा आकार व चालकाचा अतिकालीक भता वसूल करताना दैनिक १ तासाची सुट देऊन उर्वरीत अतिकालीक तासांची आकारणी नैमित्तीक करार

घेण्या-यांकडून करण्यात येईल, त्यामुळे पुर्वी देण्यात येणारी ३०० कि.मी.पेक्षा जास्त आकारणीय कि.मी झाल्यास चालकाचा अतिकालीक भत्ता माफ करण्याची सवलत रद्द करण्यात येत आहे.

## १३. अधिक प्रवाशी बोजा (जादा भार)

(१) यापूर्वीच मान्य केल्यानुसार केवळ साध्या व परिवर्तन गाडीच्या आसन क्षमतेच्या २५ टक्के जादा (अधिक) प्रवाशी विनामुल्य नेता येतील.

(२) पक्षकाराने विनापरवानगी उपरोक्त मर्यादेपेक्षा अधिक प्रवासी नेल्यास ते विनातिकीट समजले जातील व उपरोक्त दराने येणा-या दंडास ते पात्र होऊन तो अधिक बोजा (जादा भार) म्हणून समजला जाईल व त्याचा आकार पुढील सुत्राप्रमाणे पक्षकारांकडून खालील दरानुसार वसूल केला जाईल.

अ) एकेरी फेरीसाठी १६५ पैसे प्रति कि.मी.
ब) दुहेरी फेरीसाठी ८३ पैसे प्रति कि.मी.

(३) अंतिम आकारणी रू.१/- च्या पटीत करण्यात येईल.

(४) कोणत्याही परिस्थितीत निमआराम, वातानुकूलीत बसेसमधून आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी नेता येणार नाहीत.

(५) आंतरराज्य सेवेच्या नैमित्तीक करारावरील बसेसना अधिक बोजा अनुज्ञेय नाही.

## १४. कमी आसनाच्या मागणीवर जास्त आसनाची गाडी देण्याबाबत

सध्या महामंडळाकडे ४९, ५० व ५५ आसन क्षमतेच्या साध्या गाडया असून पक्षकाराकडून ३५,४०,४५ इत्यादी आसन क्षमतेच्या गाडीची मागणी आल्यास त्याला कमी आसनांसाठी जास्त आसनांची गाडी देण्यात येत होती. आता या पद्दतीत बदल करण्यात आला असून देण्यात येणारी सवलत रद्द करण्यात आली असून खालील प्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत.

नैमित्तीक करार स्विकारणा-या पक्षकाराने रा.प.महामंडळाकडे असलेल्या बसेसच्या पुर्ण आसन क्षमतेचा नैमित्तीक करार करण्यात यावा. ब-याचवेळा विभागामध्ये नैमित्तीक करार धारक कमी आसनासाठी बसेसची नोंदणी करतो व प्रत्यक्षात जास्त प्रवासी नेण्याचा प्रयत्न करून काही वेळा न्यायालयीन तक्रारी निर्माण होतात म्हणून त्यासाठी नैमित्तीक करारातील प्रस्तावीत केलेल्या कि.मी.च्याच दराने बसेसच्या पूर्ण आसन क्षमतेनुसार नैमित्तीक करार करण्यात येईल, यापुढे कमी आसनांच्या नैमित्तीक करारासाठी जास्त आसनांची बस देता येणार नाही.

## १५. आंतरराज्य नैमित्तिक करार

पक्षकाराकडून आंतरराज्य मार्गावर बसेसची मागणी होते त्यावेळी विभाग नियंत्रक मध्यवर्ती कार्यालयाकडे विचारणा करतात. काहीवेळा यामध्ये वेळेचा अपव्यय होण्याची शक्यता असते म्हणून असे आंतरराज्य नैमित्तीक करार विभाग नियंत्रकाना करता यावेत यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

(अ) सामान्य स्थायी आदेश क्र.१२०१दिनांक१.३.१९७२ चा परिच्छेद क्र.१६ मधील तरतुदीव्यतिरिक्त आंतरराज्य नैमित्तीक करारासाठी आणखी खालील अटींचा समावेश करण्यात आलेला आहे, की जेणेकरुन अनेक राज्यातील आंतरराज्यीय करार स्विकारता येणे शक्य होईल.

(१) ज्या राज्यात नैमित्तिक कराराची बस जाणार आहे त्या राज्यात द्यावे लागणारे प्रवासी कर, वाहन कर, इतर कर पक्षकारास द्यावे लागतील, मात्र त्याची माहिती संबंधीत विभाग नियंत्रक पक्षकारास देतील.

(२) आंतरराज्यात होणारा इंधनाचा खर्च पक्षकारास प्रथमत: करावा लागेल. मात्र त्याची वळती अंतिम बिलातून करण्यात येईल, त्यासाठी झालेल्या खर्चाच्या पावत्या जोडल्या पाहिजेत.

(३) आंतरराज्यात लागणारा खास परवाना ( Special permit ) संबंधीत विभाग नियंत्रक उपलब्ध करुन देतील.मात्र त्याचे शुल्क पक्षकारास भरावे लागेल.

(४) नैमित्तीक कराराचे प्रति बस प्रतिदिन सरासरी ३०० पेक्षा जास्त आकारणीय कि.मी.झाल्यास दैनंदिन (सरासरी) १ तास चालकाचा अतिकालिक भत्ता माफ करून उर्वरीत अतिकालीक भत्याची वसुली पक्षकाराकडून करण्यात येईल. परंतु त्यापेक्षा कमी कि.मी.झाल्यास चालकाचा संपूर्ण अतिकालिक भत्ता पक्षकाराकडून वसूल केला जाईल.

(५) चांगल्या सुस्थितीतील गाडी नैमित्तिक करारासाठी देण्यात येईल. परंतु मार्गात काही बिघाड झाल्यास गाडी दुरुस्त करण्याचा खर्च प्रथमत: पक्षकारास करावा लागेल आणि करार पूर्ण झाल्यावर अंतिम बिलातून हा खर्च वळती करण्यात येईल.

(६) गरज पडल्यास २ चालक देण्यात येतील, मात्र त्यापैकी एका चालकाचे वेतन व इतर भत्त्याचा खर्च पक्षकारास करावा लागेल, त्याची आकारणी अंतिम बिलात करण्यात येईल. यामध्ये बदल करण्यात येत असून एका चालकाच्या वेतनाऐवजी पक्षकाराकडून अतिरीक्त चालकाचा दैनिक खर्च म्हणून प्रतिदिन रू. ५००/- वसुल करण्यात येतील, परंतु बसचे प्रतिदिन सरासरी ५०० कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त कि.मी.झाल्यास दुस-या चालकाचा प्रतिदिन, दैनिक खर्च पक्षकाराकडून वसूल केला जाणार नाही.

(७) दर दोन ते तीन दिवसांनी वाहन कोणत्या राज्यात आहे व वाहनाच्या स्थितीबाबत माहिती पक्षकाराने संबंधित आगार प्रमुखास दिली पाहिजे.

(८) आंतरराज्य नैमित्तीक करारात अन्य सवलती अनु क्र. २ इ मधील १ ते ५ प्रमाणे लागू रहातील.

(वरील शर्तीच्या व अटींच्या अधीन राहून व या अटी मान्य असल्याचे पक्षकाराकडून अर्जासोबत लिहून घेतल्यानंतर व योग्य त्या अनामत रक्कमेचा भरणा केल्यानंतर असे आंतरराज्य नैमित्तिक करार स्विकारण्यात यावेत.)

**१६. <u>अनामत रक्कम</u>**

दिनांक १.१२.९९ पासून अनामत रक्कम २० टक्के ठेवण्यात आलेली आहे, यापुढे ती पध्दत तशीच चालू ठेवण्यात येईल.

अनामत रक्कम आकारण्याचे सुत्र खालीलप्रमाणे आहे.

$$\frac{\text{कि.मी. आकार + खोळंबा आकार ( अंदाजे ) X १२०}}{\text{१००}} = \text{अनामत रक्कम}$$

**१७. <u>सर्व्हिस टॅक्स</u>**

नैमित्तीक कराराच्या सेवाकरांबाबत या कार्यालयाने वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत, सदरच्या सूचनेप्रमाणे नैमित्तिक कराराच्या बसेसवर केंद्र शासनाने ठरवून दिलेला सेवाकर वसूल करून तो शासनास भरावा. सदरचा कर वसूल करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेंच मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र.राप / वाह / चालन/ सा. ८८ / ६५१४ दिनांक ३ नोव्हेंबर, २००९ अन्वये सेवाकर वसुलीबाबत सूचना प्रसारीत करण्यात आलेली आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१८. नैमित्तीक कराराचे परिपत्रकातील नियम, अटी व शर्तींची माहिती पक्षकारास देणे.**

ब-याचवेळा नैमित्तीक करारातील नियमांची पक्षकारास माहिती नसल्यामुळे महामंडळ व पक्षकार यांत मतभेद होऊन वेळप्रसंगी न्यायालयीन प्रश्न उदभवतात. सदरच्या तक्रारी टाळण्यासाठी पक्षकारास नैमित्तीक कराराच्या नोंदणी फॉर्म सोबत परिपत्रकाची प्रत देण्यात येईल.

१९. या दरांची अंमलबजावणी दिनांक ११/०५/२०१० पासून करण्यात येत असली तरी दिनांक ११/०५/२०१० पुर्वी अनामत रक्कम स्विकारून नोंद केलेल्या परंतु दिनांक ११/०५/२०१० रोजी किंवा त्यानंतर पार पडलेल्या नैमित्तीक कराराना जुने दर लागू होतील. तरी हे परिपत्रक मिळाल्यानंतर दिनांक ११/०५/२०१० रोजी पासून लागू होणा-या नैमित्तिक कराराचे कि.मी.दर अटी व शर्तीनुसार दिनांक ११/०५/२०१० किंवा त्यानंतरच्या तारखांसाठी नव्या दरानेच नोंदणी करण्यात येईल.